# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/५९

Telephone No. : 020-25621156/57/59

ईमेल/ Email : approval@unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)

Academic Section (Approval Cell)

संकेतस्थळ/ Website: www.unipune.ac.in


संदर्भ क्र : सीसीओ/ 318

दिनांक : 30/01/2025

प्रति,

प्राचार्य/सचिव,

सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय:– महाविद्यालयीन शिक्षकांच्या ७ व्या वेतन आयोगानुसार वरिष्ठ श्रेणी/स्टेज २ (AL 11) व निवड श्रेणी/स्टेज ३ (AL 12) स्थाननिश्चितीसाठी दि. २४ जून २०२४ शासन पूरक पत्राबाबत...

संदर्भ:– मा. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांच क्र. शासन पूरक पत्र क्र. २३०९/प्र.क्र.१२८/विशि–१, दि. २४ जून, २०२४

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सुधारित केंद्रीय ७ वा वेतन आयोग व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसुचनेनुसार अकृषी विद्यापीठे, राष्ट्रीय विधी विद्यापीठे , शासकीय व अशासकीय महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यामधील अध्यापकांच्या नियुक्तीसाठी किमान शैक्षणिक पात्रता विद्यापीठ अनुदान आयोग नियमन २०१८, मधील मानके राखण्यासाठी उपाययोजना याबाबतच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचा दि. ०५ मार्च, २०२४ रोजीचा शासन निर्णयामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. शासन पूरकपत्र क्र. २३०९/प्र.क्र.१२८/विशि–१, दि. २४ जून, २०२४ नुसार दुरूस्ती सुचविण्यात आलेली आहे. सदर शासन पूरक पत्राच्या अनुषंगाने, महाविद्यालयीन अध्यापकांची ७ व्या वेतन आयोगानुसार वरिष्ठ श्रेणी/स्टेज २ (AL 11) व निवड श्रेणी/स्टेज ३ (AL 12) स्थाननिश्चितीसाठी करण्यासाठी संबंधित अध्यापकांनी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे बाबूरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी, पुणे या केंद्रावर आपली नव्याने नाव नोंदणी करावी.

तरी आपल्या महाविद्यालयातील जे सहायक प्राध्यापक संदर्भीय शासन पूरक पत्रानुसार बाधित असतील अशा अध्यापकांनी आवश्यक ते शुल्क भरून तसेच स्थाननिश्चितीबाबतची सर्व आवश्यक ती कागदपत्रे जोडून दि. ०७ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत उपरोक्त केंद्रावर आपली नाव नोंदणी करावी, म्हणजे आपल्या प्रस्तावावर पुढील योग्य ती कार्यवाही करणे शक्य होईल. तद्नंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधित अध्यापकांच्या निदर्शनास आणावे, ही विनंती.

कळावे,

30/1/2025

(स. द. डाबखर)

उपकुलसचिव

सोबत :– वरीलप्रमाणे